# चिखलदरा तालुक्यातील दुध उत्पादन व वितरण :- एक अध्ययन

विशेष संदर्भ - अलाडोह, शहापूर, लवादा, पांढरी

**प्रस्तावना -**

भारत हा कृषिप्रधान देश असून जवळपास ८० % लोक शेती व्यवसाय करतात. भारतासारख्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत जनावरांची आणि शेती उपयोगी जनावरांची आणि पाळीव प्राण्याची उपयुक्तता खूप आहे. पशुपालन हा दुध उत्पादनाचा पाया आहे व भारतात शेती व्यवसायाबरोबरच पशुपालन व्यवसाय महत्वाचा मानला जातो. दुध व्यवसाय हा शेतकऱ्यांचे आणि देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्याचे एक महत्वपूर्ण साधन आहे. कृषी क्षेत्रातील यांत्रिकीकरणामुळे पशुकडून जी शेतीशी संबंधित कामे केली जात असत त्याचे प्रमाण कमी झाले म्हणजेच शेती क्षेत्रातील विविध कार्यासाठी होणारा पशुचा वापर कमी झाला याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांच्या प्राधान्य क्रमात बदल झाला तो असा की सामान्यत: शेतीसाठी जनावरे पाळण्याऐवजी दुध उत्पादन देणारी जनावरे पाळण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला व त्याचेच पडसाद भारतातील पशुधनावर पडलेले दिसून येतात. स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारतातील दुध व्यवसायाचा विकास वेगाने झाला. खाजगी आणि सहकारी अशा दोन्ही क्षेत्रात हा व्यवसाय सुरु असून देशाला दुध उत्पादन, दुध प्रक्रिया आणि दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करून देत आहे व त्याच बरोबर देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात आमुलाग्र बदल झालेले दिसून येत आहेत व याचे महत्वाचे कारण 'दुधाचा महापूर' हि योजना असून यामुळे देशात धवल क्रांती घडून आली. पशुधन विकास, दुध व्यवसाय, दुध उत्पादन, पशुवैद्यकीय सेवा याबाबत सरकारी धोरण हे या क्षेत्रातील उत्पादकता वाढविण्यास वाढविण्यास कारणीभूत सहकारी क्षेत्राकडून पशुखाद्य पुरवठा, कर्ज पुरवठा आणि पशु सेवांचा पुरवठा यामुळे पशुधन क्षेत्राच्या विकासाला चालना मिळाली.

**भारतातील दुग्धोत्पादन :-**

भारतात फार पूर्वी पासूनच दुधाचे उत्पादन केले जाते. दुध व दुधापासून तयार केलेले पदार्थ भारतामध्ये प्राचीन काळापासून जरी वापरण्यात असले तरी दुग्धव्यवसाय मात्र बऱ्याच प्रमाणात विस्कळीत व कौटुंबिक पातळीवरच चालत असे त्याला  व्यवसायाचे फारसे स्वरूप नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळानंतर नियोजन काळात सरकारने विशेष प्रयत्न करून सहकारी दुध उत्पादन संस्थाची संख्या वाढवून दुध

उत्पादन वाढीसाठी विविध कार्यक्रम राबविले. दुध उत्पादनाच्या बाबतीत देशात स्वयंपूर्णत: निर्माण करण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागात दुध उत्पादकांच्या सहकारी संस्थाना चालना देऊन त्यांच्यामार्फत दुधावर विविध प्रक्रिया करून दुध आणि दुग्धजन्य पदार्थ निर्माण करण्यात आले व त्यांना शहरी भागापर्यंत पोहोचवून शहरी बाजारपेठ मिळवून देण्यात आली आणि त्यांच्यात साखळी निर्माण झाली.

**अध्ययनाचे उद्दिष्ट्ये :-**

१) चिखलदरा तालुक्यातील अलाडोह, शहापूर, लवादा, पांढरी गावातील दुध उत्पादनाचा अभ्यास करणे.
२) दुध उत्पादकांच्या दुध वितरणाचा अभ्यास करणे.
३) दुध उत्पादकांच्या उत्पन्नाचा अभ्यास करणे.
४) दुध उत्पादकांच्या खर्चाचा अभ्यास करणे.
५) दुध उत्पादकांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

**अध्ययन पध्दती :-**

संशोधक हा मागील चार वर्षापासून कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदरा येथे वाणिज्य विभागात सहा. प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. त्यांच्या संपर्कातील अनेक विद्यार्थी हे संशोधनाकरिता निवड केलेल्या गावातील रहिवासी असून अनेकांचा व्यवसाय हा दुधाचा आहे त्यामुळे त्यांच्या सोबत चर्चा करीत असताना संशोधकाच्या मनामध्ये संबंधित विषयाबाबत जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली व त्या अनुषंगाने वरील विषयाची निवड केली.

**नमुना निवड :-**

सध्याचा अभ्यास महाराष्ट्रातील चिखलदरा जवळील भागातील अलाडोह, शहापूर, लवादा, पांढरी या चार गावांची निवड करून सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. प्रत्येक गावातील १० या प्रकारे ४० दुध उत्पादकांची माहिती निवडक सोयीस्कर नमुना निवड पध्दतीने केली.

या संशोधनाकरिता तथ्य गोळा करण्याकरिता प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची व निरीक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला.

**तथ्यांचे वर्गीकरण व विश्लेषण :-**

मिळालेल्या तथ्यांचे विश्लेषण करून त्या आधारावर काही निष्कर्ष काढण्यात आले.

**गायीपासून मिळणारे दुध :-**

| अ.क्र. | विवरण | दुध उत्पादकाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | ०१ ते ०३ | १५ | ३७.५० |
| २) | ३.१ ते ०६ | १४ | ३५ |
| ३) | ६.१ ते १० | ०९ | २२.५० |
| ४) | १० पेक्षा अधिक | ०२ | ०५ |
| | एकूण | ४० | १०० |

स्त्रोत - प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, गायीचे दुध उत्पादन करणाऱ्यांची संख्या ०१ ते ०३ लिटर गायीचे दुध उत्पादन करणाऱ्यांची संख्या ही १५ असून त्यांची टक्केवारी ही ३७.५ आहे. ३.१ ते ०६ लिटर दुध उत्पादन करणाऱ्यांची संख्या ही१४ असून टक्केवारी ही ३५ % आहे. ६.१ ते १० लिटर दुध उत्पादन करणाऱ्यांची संख्या ही ०९ असून टक्केवारी ही २२.५० % आहे. तर १० पेक्षा अधिक उत्पादन करणाऱ्यांची संख्या ही फक्त ०२ आहे त्याची टक्केवारी ०५ % आहे.

यावरून असे दिसून येते की ०१ ते ०३ लिटर उत्पादकांची संख्या ही सर्वाधिक आहे तसेच ३.१ ते ०६ लिटर करणाऱ्यांची संख्या लक्षणीय म्हणजे ३५ % आहे. १० लिटर पेक्षा अधिक उत्पादकांची संख्या ही नगण्य म्हणजेच ०५ % एवढीच आहे.

**म्हशीपासून मिळणारे दुध :-**

| अ.क्र. | विवरण | दुध उत्पादकाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | ०१ ते ०५ | १३ | ३२.५ |
| २) | ०६ ते १० | ०९ | २२.५ |
| ३) | ११ ते १५ | ११ | २७.५ |
| ४) | १५ पेक्षा जास्त | ०७ | १७.५ |
| | एकूण | ४० | १०० |

स्त्रोत - प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, म्हशीपासून दुध उत्पादन करणाऱ्यांची संख्या ०१ ते ०५ लिटर म्हशीचे दुध उत्पादन करणाऱ्यांची संख्या ही १३ असून त्यांची टक्केवारी ही ३२.५ % आहे. ०६ ते १० लिटर दुध उत्पादन करणाऱ्यांची संख्या ही ०९ असून टक्केवारी ही २२.५% आहे. ११ ते १५ लिटर दुध उत्पादन करणाऱ्यांची संख्या ही ११ असून टक्केवारी ही २२.५० % आहे. तर १५ पेक्षा अधिक उत्पादन करणाऱ्यांची संख्या ही फक्त ०७ आहे त्याची टक्केवारी १७.५ % आहे.

यावरून असे दिसून येते की ०१ ते ०५ लिटर उत्पादकांची संख्या ही सर्वाधिक आहे तसेच ३.१ ते ०६ लिटर करणाऱ्यांची संख्या लक्षणीय म्हणजे ३५ % आहे. १५ लिटर पेक्षा अधिक उत्पादकांची संख्या ही कमी असल्याची आढळून येते म्हणजेच १७.५% एवढी आहे.

**<u>वितरण व्यवस्था :-</u>**

| अ. क्र. | विवरण | दुध उत्पादकाची संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १) | घरीच पदार्थ बनविणे | ०९ | २२.५ |
| २) | हॉटेल | १८ | ४५.०० |
| ३) | किरकोळ विक्री | १३ | ३२.५ |
| | एकूण | ४० | १०० |

स्त्रोत - प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

वरील सारणी वरून आपणास निदर्शनास येते की सर्वाधिक लोक हॉटेल मध्ये देतात अशी १८ म्हणजेच ४५ % उत्तरदात्यांनी प्रतिक्रिया व्यक्ती केली तर किरकोळ दुध विक्री करणाऱ्यांची संख्या ही १३ म्हणजे ३२.५ % एवढी आहे तर सर्वात कमी म्हणजे २२.५ % लोक हे दुधाचे पदार्थ घरीच बनवितात यामध्ये प्रामुख्याने खवा, पनीर, दही, ताक, तूप कलाकंद, रबडी बनवून विकतात.

**दुधापासून मिळणारे मासिक उत्पादन :-**

| अ. क्र | विवरण | दुध उत्पादकाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | ०२ ते ०५ हजार | ०८ | २०.०० |
| २) | ५.१ ते ०८ हजार | ११ | २७.५० |
| ३) | ८.१ ते १० हजार | ०५ | १२.५० |
| ४) | १० हजारांपेक्षा जास्त | १६ | ४०.०० |
| | एकूण | ४० | १०० |

स्त्रोत - प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, ०२ ते ०५ हजार उत्पादन असणाऱ्यांची संख्या ही ०८ म्हणजेच २० % आहे. ५.१ ते ०८ हजार उत्पादन असणाऱ्यांची संख्या ११ असून त्यांची टक्केवारी ही २७.५० % आहे. ८.१ ते १० हजार उत्पादन असणाऱ्यांची संख्या ही ०५ असून १२.५० % आहे. १० हजारापेक्षा जास्त उत्पादन असणाऱ्यांची संख्या १६ असून त्यांची टक्केवारी ही ४० टक्के आहे.

यावरून असे दिसून येते की, १० हजार पेक्षा जास्त दुध उत्पादन असणाऱ्यांची संख्या ही सर्वाधिक म्हणजे ४० % आहे तर सर्वात कमी ८.१ ते १० हजार इतके उत्पादन असणाऱ्यांची संख्या ही १२.५० % आहे.

**दुध उत्पादनासाठी येणारा मासिक खर्च :-**

| अ.क्र | विवरण | दुध उत्पादकाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| २) | ०२ ते ०५ हजार | ०६ | १५ |
| २) | ५.१ ते ०८ हजार | १२ | ३० |
| ३) | ८.१ ते १० हजार | १४ | ३५ |
| ५) | १० हजारांपेक्षा जास्त | ०८ | २० |
| | एकूण | ४० | १०० |

स्त्रोत - प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, ०२ ते ०५ हजार खर्च असणाऱ्यांची संख्या ही ०६ म्हणजेच १५% आहे. ५.१ ते ०८ हजार खर्च असणाऱ्यांची संख्या १२ असून त्यांची टक्केवारी ही ३० % आहे. ८.१ ते १० हजार खर्च असणाऱ्यांची संख्या ही १४ असून ३५ % आहे. १० हजारापेक्षा जास्त खर्च असणाऱ्यांची संख्या ०८ असून त्यांची टक्केवारी ही २० टक्के आहे.

यावरून असे दिसून येते की, ८.१ ते १० हजार खर्च असणाऱ्यांची संख्या ही सर्वाधिक म्हणजे ३५ % आहे तर सर्वात कमी ०२ ते ०५ हजार खर्च असणाऱ्यांची संख्या ही १५% आहे.

**दुग्ध व्यवसायात येणाऱ्या समस्या :-**

| अ. क्र. | विवरण | दुध उत्पादकाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | वाहतूक व्यवस्था | ०९ | २२.५ |
| २) | जनावरांचा चारा | १९ | ४७.५ |
| ३) | वितरणाची व्यवस्था | १२ | ३० |
| | एकूण | ४० | १०० |

स्त्रोत - प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, दुधाचे उत्पादन करणाऱ्या दुध उत्पादकांना चारा समस्येचे प्रमाण जास्त आढळून येते म्हणजे ४७.५% इतकी टक्केवारी आहे तर वाहतूक व्यवस्था समस्या असणाऱ्यांची संख्या ०९ असून त्यांची टक्केवारी २२.५ इतकी आहे तर वितरणाची समस्या असणाऱ्या दुध उत्पादकांची संख्या १२ असून त्यांचे प्रतिशत प्रमाण ३०% आहे.

यावरून असे आढळून येते की, अभ्यास क्षेत्रातील दुध उत्पादकासमोरील जनावरांचा चारा ही समस्या मोठ्या प्रमाणता आढळून येते.

**<u>प्रमुख निष्कर्ष :-</u>**

एकंदरीत सदर अभ्यासातून निघालेले काही प्रमुख निष्कर्ष खालीलप्रमाणे.

१) संशोधनातील घेतलेल्या गावांमध्ये उत्तरदात्यांचे एकूण दुधाचे उत्पादन ५०१ लिटर आहे यापैकी गायीचे दुध १०८ लिटर आहे तर म्हशीचे दुध ३९३ लिटर आहे.

२) दुधाची विक्री करीत असताना दुध उत्पादक हे हॉटेल व घरोघरी दुध विक्री करताना दिसून येते.

३) दुध उत्पादन करणाऱ्या सर्वाधिक दुध उत्पादकांचे मासिक उत्पन्न १० हजारापेक्षा जास्त आहे तर मासिक खर्च हा ८.१ ते १० हजारापेक्षा जास्त सर्वाधिक दुध उत्पादकांचा आहे यावरून दुध उत्पादकांना फारच अल्प प्रमाणात नफा प्राप्त होतो.

४) अभ्यास क्षेत्रात पायाभूत सुविधांची कमतरता आहे जसे की, वाहतूक व्यवस्था, जनावरांना चारा, दुध डेअरी यासारख्या सुविधांचा अभाव.

**शिफारशी:-**

१) दुधाची विक्री करण्याकरिता चिखलदरा येथे कायम स्वरूपी दुध डेअरीची व्यवस्था करावी जेणेकरून दुध विक्रेत्यांना त्रास कमी होईल.

२) दुध विक्रेत्यांना दुधाची योग्य किमत मिळावी त्याकरिता शासनाने दुधाला योग्य हमी भाव जाहीर करावा.

३) दुध विक्रेत्यांच्या जनावरांना चाऱ्याकरिता शासनाने त्यांचा पडीत जमिनी खुल्या करून द्याव्या जेणेकरून त्यांच्या चाऱ्याची समस्या दुर होईल.